**पुणे महानगरपालिका**
**महिला बाल कल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक . २१**

महिला बाल कल्याण समितीची **पाक्षिक सभा बुधवार,दि. ११/२/२००९** रोजी **दुपारी ४:००** **( चार)** वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय क्रं.१२०**
**मा.सौ.संगीता दत्तात्रय गायकवाड यांचे दि. १३/१/२००९ चे पत्र.**

औंधगावातील गोळवलकर गुरूजी मनपा शाळा क्र. ५४ येथील जुने टॉयलेट पाडण्यात यावे. या टॉयलेटचा वापर गेली २ वर्षे बंद केलेला आहे. याच ठिकाणी बाजूला नविन टॉयलेट बांधलेले आहे. आणि वापर ही सुरू आहे. या ठिकाणचे जुने बंद टॉयलेट पाडण्यात यावे
या विषयाचा १५ दिवसात अभिप्राय द्यावा.

**विषय क्रं.१२१**
**मा.सौ.दिपाली ओसवाल व मा.विष्णू हरिहर यांचे दि. २९/१/२००९ चे पत्र.**

पुणे मनपा संचालीत श्री.छत्रपती शिवाजी तंत्र माध्यमिक शाळा केंद्र, शुक्रवार पेठ, पुणे येथील जे मनपा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नवीन आकृतिबंधामुळे अतिरिक्त ठरत आहेत. त्या सेवकांना पुणे मनपाच्या विविध खात्यामध्ये समाविष्ट करण्यात यावेत.

**विषय क्रं.१२२**

पुणे मनपाच्या माध्यमिक व तांत्रिक शिक्षण कार्यालयाकडील उच्च माध्यमिक शिक्षण सेवक ( एकवट मानधन दरमहा रू.५०००/-, तीन वर्षाचे समाधानकारक सेवेनंतर समय वेतनश्रेणी रू.७२२५ ते ११०५० + मान्य भत्ते ) या हुद्याच्या जागांवर नेमणूका करणेबाबत मा.अति.महा.(वि)यांचे जा.क्र.मआ/उकाजा/से/१२१९, दि. १६/१/०९ चे पत्र.

**विषय क्रं.१२३**

पुणे मनपाच्या आरोग्य विभागात सन १९९४ मध्ये रोजंदारीवर काम केलेल्या सेवकांना पुणे मनपाच्या आरोग्य विभागाकडे कचरा बिगारी या हुद्दयावर हंगामी नेमणूक करण्याबाबत मा. विष्णू हरिहर व मा.सौ.दिपाली ओसवाल यांचे दि. ८ /८ /०८ च्या पत्रावर झालेला मा.महिला बाल कल्याण समिती ठ.क्र.५५,दि.२७/८/०८ ला अनुसरून मा. महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/उआ (जिं.घ)/से/११३०, दि. १/१/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
**( टिप – विषय क्र. १२२ व १२३ चा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**